जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २५.०९.२०२५**

महाराष्ट्रात प्रथमच सायबर वेलनेस कक्ष कार्यान्वित

अलीकडच्या काळातील सायबर गुन्हयांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे संकल्पनेतून ठाणे पोलीस आयुक्तालयात होणाऱ्या सायबर गुन्हयांचे तपासाकरिता प्रत्येक पोलीस ठाण्यात यापुर्वी सायबर कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. तसेच सदर गुन्हयांचे तपासाकरिता सायबर तज्ञ आवश्यक असल्याची बाब लक्षात घेवून त्यांनी प्रत्येक पोलीस ठाण्यात दोन सायबर तज्ञांची नेमणूक केली आहे. सायबर गुन्हयांचे तपासात गुन्हयांतील रक्कमेचा क्रिप्टोकरंसीच्या माध्यमातून अपहार होत असल्याने ठाणे पोलीस आयुक्तालयात क्रिप्टोकरंसी संबधीत तपास करण्याकरीता ठाणे पोलीस आयुक्तालयात प्रथमच सायबर पोलीस ठाणे येथे 'क्रिप्टोकरंसी अन्वेषण कक्षाची' दिनांक २४/०९/२०२५ रोजी स्थापना करून कक्षाचे उदघाटन केले आहे.

सायबर गुन्हयांतील बळीत यांची मोठया रक्कमाची सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक होत आहे. मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे संकल्पनेतून रिस्पॉन्सीबल नेटीझम व ठाणे जनता सहकारी बॅक यांचे सहकार्याने ठाणे पोलीस आयुक्तालयात प्रथमच **'सायबर वेलनेस सेंटर'** चालू करून उदघाटन केले आहे. सदर कक्षामध्ये सायबर गुन्हयात बळी पडलेल्या पिडीतांना मानसिक, तांत्रीक व कायदेशीर समुपदेशन करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत ठाणे पोलीस आयुक्तालयातील शाळा, महाविद्यालय यामध्ये सायबर सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

सदर कार्यकमास श्री.अशुतोष डुंबरे मा.पोलीस आयुक्त, ठाणे, श्री.ज्ञानेश्वर चव्हाण पोलीस सह आयुक्त, ठाणे, श्री पंजाबराव उगले अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय-१ ठाणे शहर, श्री.पराग मणेरे पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा व सायबर सेल, ठाणे, सौ.सोनाली पाटणकर CEO रिस्पॉन्सीबल नेटीझम, श्री.उन्मेश जोशी COO रिस्पॉन्सीबल नेटीझम, सुप्रसीध्द दिग्दर्शक श्री.अभिजीत पानसे व श्री.विजू माने, व ठाणे जनता सहकारी बॅकेचे अधिकारी उपस्थीत होते. तसेच श्री.प्रकाश वारके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे व इतर पोलीस अधिकारी तसेच अंमलदार हजर होते.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर